सकाळ दि. १७.७.२५

# ‘खाकी’तील माणुसकीने मिटविला दोघा भावांमधील दुरावा

## वाद संपुष्टात, विवाहात पहावयास मिळणार कौटुंबिक जिव्हाळा, बारड पोलिसांनी घेतला पुढाकार

**मुदखेड, ता.१६ (बातमीदार) :** पोलिस म्हटलं की, खाकी वर्दीतील तापट स्वभावाचा, कडक शब्दात बोलणारा, हेकेखोर, असंवेदनशील व्यक्ती अशीच प्रतिमा सर्वसामान्यांच्या मनात असते. त्यामुळे अनेकजण पोलिसांपुढे जाण्यास घाबरतात. पण, पोलिसांचा इतका धाक हवाच. पोलिसांना कर्तव्यासाठी वेळप्रसंगी थोडे कठोर व्हावे लागते. असे असले तरी या वर्दीतही मनुष्य असतो, त्यालाही मन, भावना असतात. ड्युटीसाठी कठोर बनलेला हा वर्दीतील माणूस वेळप्रसंगी मनाने तितकाच मृदू होतो. अशाच खाकी वर्दीत दडलेल्या बारड ठाण्याच्या पोलिसांनी दोघा भावांतील जुना वाद संपुष्टात आणून त्यांना एकत्र आणले. त्यामुळे पुतणीच्या लग्नात काकाच्या कुटुंबाचा येण्याचा मार्ग मोकळा झाला.

बारड (ता.मुदखेड) येथील राजेश आदिनाथ बोंदार्डे आणि भारत आदिनाथ बोंदार्डे या दोघा भावांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून मालमत्तेवरून वाद विकोपाला गेला होता. दोघांत एवढे वैमानस्य निर्माण झाले होते की, दोन्ही कुटुंब एकमेकांच्या सुखदुःखातसुद्धा सामील होत नव्हते. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर पुन्हा मालमत्तेच्या वाटणीचा वाद सुरू झाला. यानंतर अनेक वेळा भांडण, तंटे झाले. गावातील पंच कमिटी, तंटामुक्ती गाव समिती, गावातील प्रमुख व्यक्ती यांनी अनेक वेळा वाद मिटवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, त्याला यश आले नाही. सध्या बारड ठाण्यात नव्याने रूजू झालेले सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रेय मंठाळे यांनी ते शक्य करून दाखविले. दोन्ही भावांच्या मालमत्तेचा वाद पुन्हा पोलिस ठाण्यात पोहोचला. सुरवातीस पोलिसांनी वाद समजून घेत समोपचाराने मिटविण्याचा सल्ला दिला. यानंतर दोघांनीही पोलिसांनी ठेवलेला सामंजस्याच्या प्रस्तावास होकार दिला. आई-वडील राहत असलेली जागा दोघांनाही समान देण्यात आली. यासोबत राजेश बोंदार्डे यांच्या शेतातून तीस फुटांचा रस्ता भारत बोंदार्डे यांना जाण्या-येण्यासाठी खुला करून देण्यात आला. याबाबत तडजोडीचा लिखित प्रस्ताव विधी तज्ज्ञांद्वारे औपचारिकतेतून पूर्ण करण्यात आला. यामुळे दोन्हीही भावातील जुना वाद अखेर निकाली निघाला. त्यामुळे पुतणीच्या विवाहनिमित्त काकाचे कुटुंब मंगल कार्यात पहावयास मिळणार असल्याने पोलिसांची बंधुत्वाची भूमिका समाजातील वादग्रस्त कुटुंबासाठी आदर्श निर्माण करणारी ठरली.

> मालमत्तेच्या वादावरून दुरावा निर्माण झाला होता. पोलिसांनी समोपचाराने वाद मिटावा, यासाठी प्रस्ताव ठेवला होता. एखादा वाद जर सामाजिक बांधिलकीतून मिटत असेल तर कर्तव्यनिष्ठता समजून कार्य केल्यास निश्चित यश येते. ग्रामस्थांनी गावातच वाद मिटविण्यास प्राधान्य दिले पाहिजे.
>
> **-दत्तात्रेय मंठाळे,** सहायक पोलिस निरीक्षक.

> मालमत्तेचा वाद मिटत नसल्याने आमच्या दोघांमध्ये नेहमी गैरसमजातून वाद होत होते. त्यासोबतच दोन्ही कुटुंब एकमेकांच्या सुखदुःखातही सहभागी होत नव्हतो. परंतु, पोलिसांनी घेतलेल्या भूमिकांमुळे वाद मिटला. आमच्या दोघांचेही कुटुंब आता एकत्र आले. माझ्या मुलीच्या विवाहचे निमंत्रण भावाला दिले.
>
> **- राजेश आदिनाथ बोंदार्डे,** बारड.

> आमच्या दोघा भावांत वडिलोपार्जित मालमत्तेतून वाद होता. गैरसमजातून दोघांमध्ये वारंवार वाद होऊन वितुष्ट निर्माण झाले होते. पोलिसांनी ठेवलेला प्रस्ताव आम्हा दोघा भावांनाही हिताचा ठरला. कौटुंबिक वाद संपुष्टात आला. पुतणीच्या लग्नात आम्ही सहकुटुंब सहभागी होणार आहोत.
>
> **-भारत आदिनाथ बोंदार्डे,** बारड.